# अमरावती शहर दैनंदीन गुन्हे अहवाल दि.१५/०५/२०२३ चे ००.०१ ते १६.०० वा

## दुखापत

| अ.क्र. | पो.ठाणे<br>गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ<br>माहीती ता वेळ<br>गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे<br>नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पोस्टे राजापेठ अप क्र ४५०/२०२३ कलम ३२४,५०४,५०६, ३२३,४२७,३४ भादवी | सोनु बार जवळ अमरावती | दि १५/५/२३ चे २१/३०वा दि.१५/०५/२०२३चे ००/२१ वा दरम्यान दि १५/५/२३ चे०८/५५ वा | कपील गोविंदराव गोले वय ३१ वर्ष रा जेवडनगर अमरावती | १)रोनित कुकरेजा , २) साहील कुकरेजा दोन्ही दस्तुरनगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतावेळी व ठिकाणी यातील फिर्यादी याला त्याचा मित्र अतुल तुपाडे याने सांगितले कि त्याचे बहीणीचे अंगावर कुकरेजा यांचे घरातुन पाणी फेकले तेव्हा मी व माझा मित्र कुकरेजा याला समजाविण्याकरीता सोनु बार येथे गेलो व तेथे नमुद आरोपी सोबत बोलत असतांना आरोपीतांनी संगणमत करुन हॉकी सारख्या लाठीने डोक्यावर हातावर मारहाण करुन जख्मी केले व फिर्यादीचे उजव्या हातावर मारुन जख्मी करुन शिवीगाळ केली व मारण्याची धमकी दिली व मोबाईल फोडुन नुकसान केले अश्या फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला. |

## विनयभंग :—०१ (पान क्र ०१)

| अ.क्र. | पो.ठाणे<br>गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ<br>माहीती ता वेळ<br>गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे<br>नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | बडनेरा अप.क्र.३४३/२०२३ कलम ३५४ , ३५४(अ) स ४५२ भा.दं.वि. | ---------- | घटना.ता.वेळ दि.१४.०५.२०२३ चे १४.३० वा.<br>माहिती ता.वेळ दि.१४.०५.२०२३ चे २३.२० वा.<br>दाखल.ता.वेळ दि.१५.०५.२०२३ चे ००.०९ वा. | एक महीला | सिध्दार्थ बनसोड , वय ४० वर्षे | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी व आरोपी हे एकाच मोहल्यात राहतात. नमुद घटना.ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी ही तिच्या घराच्या समोरील रूमध्ये एकटीच अभ्यास करीत असतांना यातील आरोपीने अचानकपणे फि.च्या घराचे दार उघडुन आत प्रवेश केला व फि.चा उजवा हात धरून स्वतःकडे ओढले. फि.नी घाबरून आरडाओरड केली असता दुस-या रूमध्ये झोपलेले तिचे वडील व आजोबा बाहेर रूमध्ये आले असता यातील आरोपीने फि.चा हात सोडुन पळुन गेला. आरोपीने फि.च्या घरात प्रवेश करून लैंगिक उद्देश बाळगुन फि.चा हात धरून स्वतःकडे ओढुन फि.ला लज्जा निर्माण होईल असे कृत्य केले. अशा फि.च्या जबानी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल केला. |

इतर :—

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १२ |
| १ | बडनेरा अप.क्र.३४४/२० २३ कलम १३५(III) म.पो.का. | दर्गा समोरील सार्वजनिक मैदान , अलमासनगर , जुनी वस्ती बडनेरा | घटना.ता.वेळ दि.१४.०५.२०२३ चे २२.०५ वा. ते दि.१५.०५.२०२३ चे ०४.४० वा. माहिती.ता.वेळ दि.१५.०५.२०२३ चे ०४.४५ वा. दाखल.ता.वेळ दि.१५.०५.२०२३ चे ०४.५२ वा. | सरतर्फे व.पो.नि. नितीन अशोक मगर , पो.स्टे.बडनेरा अमरावती शहर | १)मजहर खा अफसर खा , वय ५० वर्षे , रा.अलमासनगर , जुनी वस्ती बडनेरा २)अब्दुल सत्तार अब्दुल कादर , वय ६० वर्षे , रा.नुरनगर , जुनी वस्ती बडनेरा ३)रऊफ खा सरफराज खा , वय ७० वर्षे , रा. अलमासनगर , जुनी वस्ती बडनेरा ४)अब्दुल सलीम अब्दुल हाफीज , वय ५० वर्षे , रा.चमननगर , जुन वस्ती बडनेरा ५)अब्दुल शगीर अब्दुल मजीद , वय ५० वर्षे , रा.अलमासनगर , जुनी वस्ती बडनेरा ६)अब्दुल रऊफ पटेल अब्दुल रफिक , वय ४५ वर्षे , रा.अलमासनगर , जुनी वस्ती बडनेरा | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील आरोपी हे अलमास मियाँ उर्फ कमलीवाले बाबा दर्गा या संस्थेचे पदाधिकारी असुन त्यांना कव्वाली कार्यक्रमकरीता २२.०० वा. पावेतो परवानगी देण्यात आली असतांना नमुद आरोपीतांनी दि.१४.०५.२०२३ चे २२.०५ वा. पासुन कव्वालीचा कार्यक्रम सुरू करून दि.१५.०५.२०२३ रोजीचे ०४.४० वा. पर्यंत लाऊड स्पीकर वाजवुन कार्यक्रम सुरू ठेवले. आरोपींनी मा.पोलीस आयुक्त सा.यांचे आदेश क्र.पो.आअ/विशा/कावसु/१६९२/२०२३ दि.१०.०५.२०२३ रोजी सदर कार्यक्रम संबंधाने दि.१२.०५.२०२३ चे ००.०१ ते दि.२६.०५.२०२३ चे २४.०० वा. पावेतो लागु असलेल्या कलम ३७(१) व ३७(२) म.पो.का.नुसार जारी केलेल्या आदेशाचे उल्लंघन केले. वरून आरोपीतांचे कृत्य कलम १३५(III) म.पो.का.अन्वये गुन्हा होते. अशा फि.चे लेखी फिर्यादवरून सदरचा गुन्हा दाखल केला. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | बडनेरा अप.क्र.३४५/२०२३ कलम १८६ , २९४ , ५०६ भा.दं.वि. | आरोपीचे राहते घरासमोर , ग्राम पार्डी देवी , बडनेरा जि.अमरावती | घटना.ता.वेळ दि.१५.०५.२०२३ चे १०.०० वा.<br>माहिती ता.वेळ दि.१५.०५.२०२३ चे १३.०० वा<br>दाखल.ता.वेळ दि.१५.०५.२०२३ चे १४.१४ वा. | एक महीला | आदित्य अशोक ठाकरे , वय ३० वर्षे , रा.ग्राम पार्डी देवी , ता.जि.अमरावती | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी ह्या महावितरण केंद्र अंजनगावबारी येथे विद्युत सहायक पदावर कार्यरत असुन नमुद घटना.ता.वेळी व ठिकाणी यातील फि.ह्या त्यांच्या महिला सहकारी सोबत आरोपीच्या घरासमोर विद्युत थकीत बिल वसुली करणेकरीता गेले असता सदर विद्युत बिल थकीतदार हिचा नातु यातील आरोपी हा भेटल्याने फि.ने त्याला तुमचे मागील विद्युत बील थकीत आहे , ते तुम्ही भरले काय असे विचारले असता आरोपीने आमचे घरची लाईन डिम झालेली आहे, आम्ही तोंडी तक्रार केली आहे असे म्हटले. त्यावर फि.ने आरोपीस आम्ही तुमचे काम केले आहे , तुम्ही घरची वायरींग चेक करा असे म्हटल्याच्या कारणावरून आरोपीने फि.शी वाद करून त्यांना अश्लिल भाषेत शिवीगाळ केली व तुम्ही पोलवरून माझे घरची इलेक्ट्रीक लाईन कापुन दाखवा तुम्हाला पोलवरून खाली पाडेल अशा धमक्या दिल्या. आरोपीने फि.हे त्यांचे शासकीय कर्तव्य पार पाडत असतांना त्यांना कामात अटकाव करून अश्लिल शिवीगाळ केली व धमकी दिली. अशा फि.चे जबानी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल केला. |
| ३ | **नागपुरी गेट अप क्र.२२८/२०२३ कलम ११(१)(क)(घ)(ड)(च) प्राण्यांना क्रुरतेने वागणुक प्रति.अधि सहकलम ५,९, ९(अ)(ब) महा प्राणी संरक्षण अधि कायदा ८३/१७७ मोटर वाहन कायदा** | **कमेला ग्रराउंड अमरावती** | **दिनांक १५/०५/२३ चे ०४/०० वा ०४/१५**<br><br>**दिनांक १५/०५/२०२३ चे ०७/१३ वा** | **सरतर्फे पोउपनि गजानन विधाते पो.स्टे नागपुरी गेट अमरावती शहर** | **झेनॉंन पीक अप कंपनीची गाडी क्र.MH २१ एक्स .४१५२** | **हकिकत अशा प्रकारे आहे की,नियंत्रन कक्ष येथुन मीळालेल्या माहीती वरुन एक झनान पीक गाडी गोवंश जनावरे कोंबुन नागपुरी गेट कडे जात आहे अशा माहीती वरुन बीट मार्शल सी आर मोबाईल यांचे मदतीने वाहनाचा शोध घेतला असता एक झेनॉंन पीक अप कंपनीची गाडी क्र.MH २१ एक्स .४१५२ पाठलाग करुन कमेला ग्राउंड येथे झनान पीक अप गाडीचे चालकाने वाहन उभे करुन पळुन गेला वरुन सदर वाहनाचे डाल्याची पाहनी केली असता त्यात १३ गोवंश जनावरे कोबुन व त्यांचे हात-पाय बांधुन निर्दयतेने वाहतुक करित असतांना दिसुन आले. नमुद आरोपीचे कृत्य कलम ११(१)(क)(घ)(ड)(च) प्राण्यांना क्रुरतेने वागणुक प्रति.अधि सहकलम ५,९, ९(अ)(ब) महा प्राणी संरक्षण अधि कायदा ८३/१७७ मोटर वाहन कायदा प्रमाणे गुन्हा होत असल्याचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | पो.स्टे.फ्रेजरपुरा अमरावती अप. क्र. ३४८/२३ कलम २८५ भा.द.वि. | यशोदा नगर चौक अमरावती | दि. १५.०५.२०२३ चे १२.३० वा. दि. १५.०५.२०२३ चे १४.२५ वा. | पो.हे.कॉं योगेश सुंदरलाल श्रीवास ब.नं. १०१५, पो.स्टे. फ्रेजरपुरा अमरावती | लक्ष्मण बकाराम मडावी वय २९ वर्ष, रा. यशोदा नगर नं. १ गल्ली नं. २ अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे कि, यातील फिर्यादी हे पो. स्टे. हद्दीत पेट्रोलिंग ड्युटी करित असतांना यातील नमुद आरोपी हा त्याचे ताब्यातील लक्ष्मी फास्ट फुड सेंटर चारचाकी गाडी सार्वजनीक ठिकाणी धोकादायक स्थीतीत ज्वालाग्राही पदार्थाचा हयगयीने मानवी जीवन धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे (गॅस सिलेंडरचा) सार्वजनीक ठिकाणी आपल्या फायद्यासाठी व्यवसाय करतांना मिळुन आला त्यास ताब्यात घेवुन त्याचे नाव गाव विचारुन सदर इसमाविरुध्द कलम २८५ भा.द.वि. प्रमाणे गुन्हा दाखल केला. ळ |

## प्रोव्हीशन

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| १. | भातकुली . | अपक्र 100/ 23 कलम 65 ई म.दा.का | ग्राम पेढी नदिच्या पुलाजव ळ | दि 15/05/2023 चे 08/30 वा | दाखलता वेळ-दि. 15.05. 2023 चे 10.32 वा | सर तर्फे नापोकॉं दिपक महादेवराव सुंदरकर वय 48 वर्षे ब.नं 1456 पोस्टे गुन्हे शाखा अमरावती शहर | किशोर नामदेवराव ईंदोरे, वय-32 रा-खोडद ता-मुर्तीजापुर जि-अकोला | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी पोस्टे स्टॉंप यांना गुपत माहती मिळाली कि यातील नमुद आरोपी हा नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी त्यांचे ताब्यात अवैधरित्या देशी दारुची वाहतुक करित आहे. अशा माहीतीवरुन सापळा रचुन त्यास पोस्टे पच मदतीने पकडले असता त्यांचे ताब्यातुन - 1)68 नग बॉंबी संत्रा देशीदारु 180 एम.एलच्या पावठ्या कि.अं.4410/-रु 2) हिरो सी.डी डिलक्स कंपनीची मोटारसायकल किं.50,000/-रु असा एकुण 54410/- रुचा माल मिळुन आल्याने सदर आरोपी चे कृत्य कलम 65 ई म.दा.का प्रमाणे होत असल्याने गुन्हा दाखल केला. |